पुढारी

# 'डॉ. कलाम यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे'

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन नियमितपणे करणे गरजेचे आहे. माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांनी केले.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभागाच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. सुनीता बोर्डे-खडसे यांनी 'वाचन प्रेरणा व तरुणाईची ध्येयप्राप्ती' विषयावर विचार व्यक्त केले. यावेळी प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. बी. सुतार, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, गौरी चिंचणे आदी उपस्थित होते.

१८ OCT 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकांकिकांनी गाजवला रंगमंच

## शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव; आटपाडीकरांची दाद

लक्ष्मण सरगर
लोकमत न्यूज नेटवर्क




आटपाडी येथे आयोजित विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी पाश्चिमात्य समूहगीत सादर केले.

**आटपाडी :** आटपाडी येथे सुरू असणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सोमवारी विविध सामाजिक विषयावर भाष्य करणाऱ्या एकांकिका सादर करण्यात आल्या. या एकांकिकांमधून विविध मानवी भावनांचा आविष्कार पहायला मिळाला.

आटपाडीच्या श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात सोमवारची सकाळ पाश्चिमात्य समूहगीतांनी उजाळली. यानिमित्ताने युवकांच्या मनावर गारुड केलेल्या विविध पाश्चिमात्य गीतांची झलक पहायला मिळाली. युवा महोत्सवात एक महत्त्वाचा भाग म्हणून एकांकिका गटाकडे पाहिले जाते. गेल्या दोन ते तीन महिन्यापासूनच तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयाचा कस लावून दमदार सादरीकरण केले. यामध्ये 'भगदाड' या एकांकिकेतून एका सामान्य कुटुंबाच्या घरामध्ये भिंतीला भगदाड पाडून चोरी होते. त्यानंतर प्रशासन आणि नेत्यांचे राजकारण यावर भाष्य करणारी एकांकिका सादर केली. 'म्याडम' ही एकांकिका सामान्य कुटुंबातील महिलेने आपल्या मुलीला शिकवण्यासाठी जिद्दीने केलेली धडपड यावर भाष्य करते.

'श्री श्री १०८ दगड' ही एकांकिका निसर्गात असणाऱ्या दगडाला दिलेले महत्त्व व त्या दगडाचे स्वतःचे असणारे दुःख, व्यथा यावर भाष्य करते. 'लालटेन' ही एकांकिका वसतिगृहात नव्याने राहण्यासाठी आलेले विद्यार्थी व अगोदर राहत असणारे विद्यार्थी यांच्यामधील कुरघोड्या, भांडण, अशी पार्श्वभूमी मांडते.

'म्हातारा पाऊस' ही एकांकिका ग्रामीण जीवनातील घटनेवर भाष्य करते.

पुढारी

# विद्यापीठ निवडणुकीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळ निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यापीठ निवडणुकीसाठी १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनासह विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक संघटना रणनीती आखण्यात मग्न झाल्या आहेत. 'सुटा'ने विद्यापीठ विकास आघाडीला एकत्रित निवडणूक लढवण्याची साद दिली होती.

यावर डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजमध्ये विद्यापीठ विकास आघाडीच्या कोअर कमिटीची बैठक झाली. या 'सुटा'बरोबर चर्चा करण्याचा निर्णय झाला असून, तसा निरोप 'सुटा'ला दिला आहे.

पुण्यनगरी

# महावीर अध्यासनाच्या विद्यार्थ्यांना मदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाकडून पदवी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेतले जातात. काही विद्यार्थी विशेषतः महिला या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास तयार होत्या; परंतु त्यांना आर्थिक अडचणीने ते शक्य नव्हते. त्यामुळे उद्योजक सुरेंद्र जैन यांनी ५ महिला अभ्यासकांची सर्व फी देणगी स्वरूपात देण्याचे जाहीर केले. याबद्दल अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जे. एफ. पाटील यांनी सुरेंद्र जैन यांचे आभार मानले.

सकाळ

# महावीर अध्यासनास सुरेंद्र जैन यांची मदत

## पाच महिला अभ्यासकांचे शुल्क भरले

**कोल्हापूर, ता. १७ :** भगवान महावीर अध्यासन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरमार्फत पदवी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेतले जातात. या अभ्यासक्रमास वयोमर्यादा नसल्याने या अभ्यासक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे. काही विद्यार्थी विशेषतः महिला या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास तयार होते; परंतु त्यांना आर्थिक अडचणीने शक्य नव्हते. सल्लागार समितीच्या बैठकीत पाच गरजू विद्यार्थ्यांना भगवान महावीर अध्यासनामध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक ती शुल्क सवलत देण्याबाबत कुलगुरूंनी मार्गदर्शन केले. त्यानुसार उद्योजक व सल्लागार समितीचे सदस्य सुरेंद्र जैन यांनी पाच महिला अभ्यासकांचे सर्व शुल्क आपण देणगी स्वरूपात देत असल्याचे जाहीर केले. त्यानुसार १५ हजार ५०० रुपयांचा रकमेचा धनादेश ही दिला. एस. पी. वेल्थचे प्रवर्तक अनिल पाटील यांनीदेखील गरजू विद्यार्थ्यांना मदत देण्याची तयारी दर्शवली. त्यांच्या देणगी बद्दल भगवान महावीर अध्यासनचे समन्वयक प्रा. डॉ. विजय ककडे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, देणगी समितीचे अध्यक्ष डॉ. जे एफ पाटील यांनी सुरेंद्र जैन यांचे आभार मानले.



सुरेंद्र जैन

तरुण भारत

# उपकुलसचिव संजय कुबल यांना पीएच. डी. जाहीर



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव संजय कुबल यांना मानव्यशास्त्र विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयाची पीएच. डी. पदवी जाहीर झाली आहे. 'महाराष्टातील राजकीय विचारातील शेतीप्रश्नांचे चर्चाविश्व' या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला आहे. या विषयासाठी त्यांना डॉ. प्रकाश पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या शोधप्रबंधामध्ये महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी वि. रा. शिंदे आणि शरद जोशी यांचा शेती व शेतकरी, शेतकरी संगठन, शेतकऱ्यांप्रती सरकार व शासन यांची कर्तव्ये आदी बाबींविषयी आर्थिक, सामाजिक व राजकीय विचार तसेच संकल्पना यांचा तौलनिक अभ्यास केलेला आहे. त्यांना पीएच. डी. जाहीर झाल्यामुळे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी अभिनंदन केले. कुबल शिवाजी विद्यापीठात गेल्या वीस वर्षापासून कार्यरत आहेत. तसेच त्यांनी मुंबई विद्यापीठाचे उपकुलसचिव, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात वित्त व लेखाधिकारी म्हणून काम पाहिले आहे.